# तलावांची
# भारतीय परंपरा



अनुपम मिश्र
अनुवादक - प्रदीप भलगे

# तलावांची भारतीय परंपरा

अनुपम मिश्र

अनुवादक प्रदीप भलवे

# तलावांची भारतीय परंपरा

अनुपम मिश्र

अनुवादक - प्रदीप भलगे

साकेत प्रकाशन

भारतीय जलसंस्कृती मंडळाचे प्रथम पुष्प

*श्री. अनुपम मिश्र यांचे*
*'आज भी खरे है तालाब' हे पुस्तक*
*गांधी शांती प्रतिष्ठान, नवी दिल्ली,*
*यांनी प्रकाशित केले आहे.*

Talavanchi Bhartiya Parampara
Translated by : Pradeep Bhalge

तलावांची भारतीय परंपरा
अनुवादक - प्रदीप भलगे

साकेत प्रकाशन क्रमांक - ९०४
पहिली आवृत्ती - २००३

प्रकाशक - साकेत बाबा भांड, साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५, म. गांधीनगर, स्टेशनरोड, औरंगाबाद - ४३१ ००५
मुद्रक - राजमुद्रा ऑफसेट, जी-२४, एम. आय. डी. सी. चिकलठाणा, औरंगाबाद - ४३१ २१०
अक्षरजुळणी - धारा प्रिन्टर्स प्रा. लि., ११५, म. गांधीनगर, स्टेशनरोड, औरंगाबाद - ४३१ ००५
मुखपृष्ठावरील छायाचित्र - साकेत भांड
किंमत - ६०.००/- रुपये

ISBN-81-7786-136-0

# मनोगत

नाथ सिडस कंपनी, औरंगाबाद यांच्या सभागृहात 'भारतीय जल संस्कृती मंडळा'च्या प्रथम बैठकीत स्टॉकहोम ॲवार्ड प्राप्त जागतिक कीर्तीचे जलतज्ज्ञ मा. डॉ. माधवरावजी चितळे यांनी भाषणाच्या ओघात आवाहन केले की, श्री. अनुपम मिश्र यांचे **'आज भी खरे हैं तालाब'** हे पारंपरिक तलावांचा आलेख मांडणारे अतिशय सुंदर पुस्तक 'गांधी शांती प्रतिष्ठान' यांनी प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचा मराठी भाषेत अनुवाद करावा.

मी जल अभियंता असल्यामुळे पाणी प्रश्नाविषयी मनात आस्था होतीच. त्यामुळे मी हे आवाहन स्वीकारण्याचा मनोदय प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ डॉ. रामचंद्र मोरवंचीकर यांच्या जवळ व्यक्त केला. दुसऱ्याच दिवशी डॉ. रामचंद्र मोरवंचीकर यांनी **'आज भी खरे हैं तालाब'** या पुस्तकाची प्रत अनुवाद करण्यासाठी मला उपलब्ध करून दिली.

पूर्वीच्या काळात नद्या आणि जलसाठ्याजवळच गावे वसविली गेली. त्यांच्या काठावरच संस्कृतीचा उदय झाला. मोसमी हवामान असणाऱ्या या भारतीय प्रदेशात वर्षातील फारच थोडा काळ पाऊस पडतो. नदी-नाल्यांतून हे पाणी भराभर वाहत समुद्राला जाऊन मिळते व फारच कमी पाणी जमिनीत मुरते. जमिनीत मुरलेले हे पाणी पुढे वर्षभर पुरवायचे असेल तर जलसाठे निर्माण करणे, भूजलाचे पुनर्भरण करणे अत्यावश्यक आहे, हे आपल्या पूर्वजांनी ओळखले होते. त्यामुळेच 'गाव तिथे तलाव' ही म्हण सार्थ ठरेल इतक्या मोठ्या प्रमाणावर तलावनिर्मिती अव्याहतपणे चालू होती. यांतील काही तलाव राजांनी बांधविले तर काही राणींनी. काही साधूसंतांनी तर काही विधवांनी, तर काही लोकसहभागातून बांधले गेले.

लोकांच्या मनात तलाव आणि पाणी याबद्दल आपलेपणा होता. तलावांची निर्मितीच नव्हे तर त्याचे पावित्र्य, शुद्धता व नियमित देखभाल, दुरुस्ती, उपलब्ध पाण्याचे न्याय्य वाटप याबाबत त्या काळी घालून दिलेले नियम खूपच स्तुत्य व चिरकाल टिकणारे होते. याबाबतचे अतिशय सुंदर वर्णन या पुस्तकात आहे. १८ व्या व १९ व्या शतकात मात्र तलावांची खूपच उपेक्षा झाल्यामुळे अनेक जलसाठे नष्ट झाले. याची लेखकास लागलेली खंत आपल्याही मनास चकटा लावून जाते.

५०-६० वर्षांपूर्वी मुबलक पाणी असणारे प्रदेश दिवसेंदिवस निर्जल होत आहेत. पाण्याचा प्रश्न अति उग्रस्वरूप धारण करत आहे. उपरोक्त इंग्रज आमदानीतील जे तलाव आज जिवंत आहेत. त्यांचे नूतनीकरण करणे, पाण्याविषयी जागृती व आत्मीयता निर्माण करणे ही ओढ या पुस्तकाद्वारे वाचकांच्या मनात निर्माण झाली तर माझे प्रयत्न सार्थकी लागले असे मी समजेन.

या पुस्तकाचा मराठीतून अनुवाद करण्यासाठी श्री. अनुपम मिश्र यांनी उदारपणे परवानगी दिली याबद्दल मी व्यक्तीशः व 'भारतीय जल संस्कृती मंडळ' त्यांचे ऋणी आहोत.

पुस्तकाचा अनुवाद करताना डॉ. माधवराव चितळे, 'भारतीय जल संस्कृती मंडळा'चे अध्यक्ष न्यायमूर्ती श्री. नरेंद्र चपळगावकर, उपाध्यक्ष श्री. डॉ. रामचंद्र मोरवंचीकर, माझे स्नेही अभियंता श्री. प्र. रा. देशपांडे व मंडळाच्या इतर सदस्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

तसेच माझी पत्नी सौ. चारू, मुले प्रांजली आणि पीयूष यांनी या कामी मला सहकार्य केले. त्यामधूनच या पुस्तकाचा जन्म झाला.

'साकेत प्रकाशन'चे श्री. बाबा भांड यांनी या पुस्तकाचे अत्यंत सुबकपणे मुद्रण व प्रकाशन केले. याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

**प्रदीप भलगे**

# प्रस्तावना

आपला प्राचीन वारसा विस्मृतीत गेला म्हणजे त्याचा आजच्या काळात सुद्धा किती उपयोग आहे हे आपल्या लक्षात येत नाही. मागच्या पिढ्यांनी भविष्यकाळाची म्हणजेच येणाऱ्या पिढ्यांची तरतूद करून ठेवण्यासाठी अनेक चांगल्या गोष्टी केलेल्या असतात. त्यांचा काही काळ उपयोग केला नाही म्हणजे त्या आपण विसरून जातो. काळ आणखी पुढे जातो. आपल्या परंपरा आणि वारसा पुनः तपासला म्हणजे त्यांची उपयुक्तता लक्षात येते. अशाच एका उपयुक्त वारशाची आठवण करून देणारे हे पुस्तक आहे.

पाण्याची वाढत जाणारी टंचाई हा जगभर चिंतेचा प्रश्न झाला आहे. अगोदरच पाण्याचे साठे कमी, दरवर्षी देशभर पडणारा पाऊस सरासरीने तुटपुंजा, जमिनीखालच्या पाण्याची पातळी सतत खाली चाललेली. पाण्याची गरज मात्र सतत वाढती. अशा परिस्थितीत पाण्याचे प्राचीन साठे, त्यांची पूर्वी असलेली व्यवस्था, पाण्याच्या नियोजनाच्या परंपरागत पद्धती यांचे स्मरण म्हणजे खरोखरच पुण्यस्मरण आहे.

अनुपम मिश्र यांचे **'आज भी खरे हैं तालाब'** हे असेच आपले स्मरण जागे करणारे पुस्तक आहे. आपले विसरलेले सामुदायिक शहाणपण पुनः लक्षात आणून देणारे हे पुस्तक आहे. या पुस्तकाचा श्री. प्रदीप भलगे यांनी केलेला नेटका मराठी अनुवाद आज प्रसिद्ध होत आहे. 'भारतीय जलसंस्कृती मंडळा'ला या प्रकाशन कार्यात सहभागी असल्याचा अभिमान वाटतो. श्री. बाबा भांड यांच्या 'साकेत प्रकाशन'ने हे उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे हा अनुवाद देखण्या रूपात प्रसिद्ध होऊ शकला.

आपल्या लोककथांतून पाण्याचे पावित्र्य, पाण्याचे साठे जतन करण्याचे महत्त्व सांगितलेले आहे. भारतीय संस्कृती नद्यांना माता मानते. हे पूजनीय आहे आणि पवित्र व शुद्ध करणारेही आहे. शिवाय ते जीवनाचा तर मूलाधार म्हणून त्यालाही जीवन हेच नाव आहे. आपल्या ऐहिक जीवनातील पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊनच आपल्या संस्कृतीत आपण पाण्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

राजांनी तलाव बांधले ते त्यांचा राजधर्म पाळण्यासाठी. आपले कर्तव्य करण्यासाठी. पण अनेक खाजगी व्यक्ती सुद्धा आपले सर्वस्व खर्चून तलाव बांधण्याला गत काळात उद्युक्त झाल्या, त्यामागची प्रेरणा मानवतेची आणि सांस्कृतिक नात्याची होती. हे पुस्तक अशा वारशाची वेधक पद्धतीने कहाणी सांगते आहे.

देशाच्या विविध भागांत प्रचंड संख्येने अस्तित्वात असणारे तलाव, तलाव बांधण्याचे कसब जाणणाऱ्या जाती, त्यांचे रक्षण करणारे लोक, बांधण्याची पद्धत, त्यावरून वेगवेगळ्या लोकभाषांत आलेले शब्द, पाण्याच्या शुद्धतेची काळजी घेणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे मानण्याच्या वर्तन परंपरा, फलौदी गावातल्या तलावाचे रक्षण हेच आपले जीवित कार्य मानणाऱ्या गैंगजी कल्ला यांच्यासारखे व्रती लोक, एकट्याने वर्षोनुवर्षे खपून तलाव खोदणारा गुराखी समाजाचा मेघजी अशी परिश्रमपूर्वक जमवलेली माहिती या पुस्तकात आहे. उपेक्षा आणि अतिक्रमणे यांच्यामुळे नष्ट होत चाललेल्या तलावांच्या जीवनदायी वारशाची आठवण हे पुस्तक करून देत आहे.

'भारतीय जलसंस्कृती मंडळा'चा उद्देशच पाण्यासंबंधीचा आपला सांस्कृतिक वारसा व आपली दुर्लक्षित संपत्ती लोकांच्या लक्षात आणून देणे, परंपरागत शहाणपण व पाण्याचे जतनाचे प्रयोग यांच्यापासून स्फूर्ती मिळवून त्याचा आजही जनतेला लाभ मिळावा म्हणून प्रयत्न करणे हा आहे. त्या उद्देशाला पूरक असे हे प्रकाशन आहे. म्हणून त्याचे विशेष स्वागत केले पाहिजे.

**नरेन्द्र चपळगावकर**

औरंगाबाद

दि. १५-३-२००३

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| तलावाच्या काठावरील इतिहास | ०९ |
| पायापासून शिखरापर्यंत | १३ |
| विश्वसागराचा नायक | १९ |
| सागराचे आगर | ३१ |
| साफ डोक्याचा समाज | ४३ |
| सहस्त्रनाम | ५१ |
| मृगतृष्णा खोटी ठरविणारे तलाव | ५९ |
| तलाव बांधतो धर्म स्वभाव | ७१ |
| आजही जिवंत आहेत तलाव | ७९ |

शेकडो, हजारो तलाव
अचानक शून्यातून
प्रकट झालेले नाहीत.
बनवून घेणारा एक
असेल तर बनवणारे
दहा होते. आणि असे
अनेक मिळून शेकडो,
हजारो तयार होत असत.
परंतु मागील दोनशे वर्षांत
थोडेबहुत नवीन शिक्षण
प्राप्त केलेल्या समाजाने
या शेकडो, हजारोंचे
फक्त शून्यच बनविले.


# तलावाच्या काठावरील इतिहास

'चांगली कामे करा' कुडन शेतकऱ्यास राजा म्हणाला होता. कुडन, बुढान, सरमन आणि कौराई हे चार भाऊ होते. सकाळी लवकर उठून चौघेही शेतावर जात. दुपारी कुडनची मुलगी सर्वांसाठी जेवण तयार करून नेत असे.

एक दिवस शेतावर जात असताना एका टोकदार दगडाची ठेच लागून मुलगी कळवळली. त्या दगडाचा तिला खूप राग आला. आपल्या जवळील खुरप्याच्या साहाय्याने तिने तो दगड उपटला. पण काय आश्चर्य, दगडाचा स्पर्श होताच लोखंडाचे खुरपे सोन्याचे झाले. मुलीच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. तो दगड उचलून मुलगी धावतपळत शेतावर पोहोचली. काकांना आणि वडिलांना एका दमात तिने सर्व कथन केले. हे ऐकून सर्व भाऊ आश्चर्यचकित झाले. सर्वजण तो दगड घेऊन तातडीने घरी आले. त्यांच्या हातातील दगड हा साधा दगड नसून तो परिस आहे हे त्यांच्या लक्षात आले. लोखंडाच्या ज्या वस्तूला परिसाचा स्पर्श करावा ती वस्तू तात्काळ पिवळ्याधमक सोन्यात परिवर्तित होऊन त्यांच्या डोळ्यांत चमकू लागे.

डोळ्यांतील चमक फार वेळ टिकली नाही. जास्तीत जास्त सकाळपर्यंत राजाच्या कानी ही गोष्ट जाईल आणि राजाचे सेवक हा परिस हिसकावून नेतील असे कुडनला वाटले, त्यापेक्षा आपणच हा परिस राजाच्या स्वाधीन करावा व सर्व काही राजाला सांगावे असे त्याला वाटले.

कथा पुढे चालू राहते. यापुढील कथेत असे काही घडते की वरील प्रसंग हा परिसाने लोखंडाला केलेल्या स्पर्शाचा प्रसंग नसून समाजालाच परिसस्पर्श करणारा प्रसंग ठरतो.



राजा परिसही घेत नाही व सोनेही घेत नाही. सर्व काही कुडन शेतकऱ्यास परत देतो आणि म्हणतो, "जा, यातून काही चांगली कामे करा. अनेक तलावांची निर्मिती करीत राहा."

ही कथा खरी आहे की ऐतिहासिक आहे हे माहीत नाही. पण मध्य भारताच्या अनेक भागांतून ही कथा इतिहासाकडे अंगुलीनिर्देश करीत लोकांच्या मनात रुजली आहे हे मात्र खरे.

या भागातील पाटन नावाच्या क्षेत्रात चार मोठे तलाव आजही उपलब्ध आहेत आणि वरील कथेला इतिहासाच्या कसोटीवर कस लावणाऱ्यांना लाजवीत आहेत. बुढागर भागातील बुढासागर, मझगवामधील सरमनसागर, कुआँग्राममधील कौराईसागर व कुंडम गावातील कुंडमसागर हे चार तलाव या कथेतील चार भावांच्या नावाने आजही उभे आहेत. सन १९०७ मध्ये गॅझेटियरच्या माध्यमातून या देशाचा व्यवस्थित इतिहास लिहिण्यासाठी भ्रमण करणाऱ्या इंग्रजांनीसुद्धा या भागातील अनेक लोकांकडून ही कथा ऐकली व हे चार तलाव पाहून खात्री करून घेतली. यातील सरमनसागर इतका मोठा आहे की याच्या किनाऱ्यावर तीन मोठी गावे वसली होती आणि ही तीनही गावे हा जलसाठा आपापल्या नावाप्रमाणे विभागून घेत असत. परंतु हा विशाल तलाव मात्र या तीनही गावांना एकत्र जोडत होता व सरमनसागर हे आपले नाव सार्थ करीत होता. सरमन, बुढान, कौराई आणि कुडन यांना इतिहास विसरलाही असेल; परंतु या लोकांनी तलाव निर्माण करून त्यांच्या किनाऱ्यावर इतिहास निर्माण केला हे मात्र खरे.

देशाच्या मध्य भागातील अनेकांच्या हृदयात जागणारी ही कथा उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिमेला सर्वदूर कोणत्या ना कोणत्या रूपात पसरलेली दिसून येते. आणि या समवेत दिसतात शेकडो - हजारो तलाव. परंतु त्यांची व्यवस्थित गणना मात्र झालेली नाही. या असंख्य तलावांची गणना करणाऱ्यांपेक्षा त्यांची निर्मिती करणारे लोक येत राहिले आणि तलाव निर्माण होत गेले.

काही तलाव राजाने बांधविले तर काही राणीने, एखादा तलाव कोणी एका सर्वसाधारण गृहस्थाने बांधला तर एखादा कुणी एका विधवेने, तर काही तलाव कोणा एका असाधारण साधूसंताने. जेव्हा जेव्हा तलाव बांधण्यात आले तेव्हा तेव्हा तो निर्माता महाराज अथवा महात्मा म्हणविला गेला. तलावांच्या निर्मात्यांना कृतज्ञ समाज अमर बनवीत गेला आणि निर्मातेही तलाव निर्माण करून समाजाप्रतीची आपली कृतज्ञता व्यक्त करत गेले.

समाज व त्याचे घटक यांच्यामध्ये या विषयातील एकमेकास पूरक संबंध असण्याचा हा काळ तसा काही छोटा काळ नव्हता. महाभारत व रामायण काळातील तलाव वगळले तरीसुद्धा असे म्हणता येईल की, पाचव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत या देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अनेक तलाव निर्माण होत गेले. साधारण एक हजार वर्षांपर्यंत अखंडपणे चाललेल्या या परंपरेत पंधराव्या शतकात काही अडचणी निर्माण झाल्या. मात्र त्या काळातही हा ओघ पूर्णपणे थांबला नाही. हा प्रवाह आटला नाही.

इतक्या प्रदीर्घ काळात या चळवळीस लाभलेले स्थैर्य समाजाच्या मनात कायमचे रुजले होते. उलथापालथीच्या या काळातही तलाव निर्मिती पूर्णपणे थांबली नाही. १८ व्या व १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत भारतात ठिकठिकाणी तलावांची निर्मिती होतच गेली.

त्यानंतर मात्र तलावांच्या निर्मितीची प्रक्रिया हळूहळू मंद होत गेली. राजकीय स्थित्यंतरे झाली. राजा आणि प्रजा यामधील तलाव निर्मितीचा सांस्कृतिक दुवा निखळला गेला. परकीय संस्कृतीचे व भिन्न वारशांचे राज्यकर्ते आल्याने स्वतःच्या वारशाकडे या समाजाने अक्षम्य दुर्लक्ष केले. तलावांची तसेच भूक्षेत्राची मोजणी करणारे मात्र जरूर आले. काम मोठे होते, कामासाठी मोजणी करणारे कमी तर होतेच, पण कमकुवतही होते. त्यामुळे ठीक मोजदादही झालीच नाही. हळूहळू काही भागात तलावांची मोजदाद झाली. मात्र वेगवेगळ्या भागांतील या गणना एकत्र करून एकदाही पूर्ण संख्या मोजली गेली नाही. तथापि या विखुरलेल्या मोजणीतूनही संपूर्ण देशातील कामाचे चित्र उजळून उठते.

तुडुंब भरलेल्या या तलावांची निर्जीव आकड्यांत नोंद करण्याचा प्रयत्न कोठून सुरू करावा? चला देशाच्या मध्यभागात पुन्हा परतू व तेथूनच या तलावांची व्यापकता पाहू या.

आजच्या रिवा जिल्ह्यात जोडौरी हे गाव आहे. साधारण २५०० लोकसंख्या असलेल्या या गावात १२ तलाव आहेत. याचजवळ आहे १५०० लोकवस्तीचे व १० तलाव असलेले गाव ताल मुकेदान. प्रत्येक गोष्टीत सरासरी काढणाऱ्यांच्या असे लक्षात येईल की, दर १५० व्यक्तींमागे एका तलावाची सुविधा या गावामध्ये आजही उपलब्ध आहे. ज्या काळात या तलावांची निर्मिती झाली त्या काळात लोकसंख्या आजच्या तुलनेत अनेक पटींनी कमी होती. याचा अर्थ आपापल्या भागात पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब गोळा करून साठविण्यावर भर देण्यात येत असे आणि संकट काळात शेजारच्या क्षेत्रामध्ये त्याचे वाटप करण्यात येई. वरुण देवतेचा हा प्रसाद गाव आपल्या ओंजळीत भरभरून घेत असे.

आणि वरुण राजाचा प्रसाद जिथे कमी मिळतो तिथे तर त्याचा एक एक कण, एक एक थेंब गोळा केल्याशिवाय ते गाव कसे बरे राहणार! त्यामुळेच अत्यंत कमी पाऊस होणाऱ्या राजस्थान व त्यातल्या कोरड्या म्हणविल्या जाणाऱ्या थरच्या वाळवंटी प्रदेशातील हजारो गावांची नावे तलावांच्या नावावरून पडलेली आहेत. गावांच्या नावासोबतच 'सर' जोडलेले आहे. 'सर' या शब्दाचा अर्थ तलाव. जिथे तलाव नाही तिथे गाव नाही. या भागात तलाव मोजण्यापेक्षा गावे मोजून गावांची दुप्पट किंवा तिप्पट केली असता तलावांची संख्या मिळते.

मध्ययुगामध्ये लोकसंख्येची वाढ काही पटीत होऊन शहरे आकारात आली. त्या वेळी पाणी मात्र उसने आणले नाही किंवा (आजच्या शहराप्रमाणे) चोरूनही आणले नाही. गावांप्रमाणेच शहरांनीही पाण्याची व्यवस्था स्वतः केली.

इतर शहरांचे सोडा, राजधानी दिल्लीतसुद्धा कोणे एके काळी ३५० छोटे मोठे तलाव होते याची नोंद सापडते.

गावातून शहरात व शहरातून राज्याकडे वळूया. पुनश्च रिवा प्रदेशात जाऊ या. आजच्या मापदंडानुसार हा भाग मागासलेला आहे. मात्र पाण्याच्या व्यवस्थेचा मापदंड लावला तर मागील शतकात तिथे जवळजवळ ५००० तलाव होते.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या १०० वर्षांपूर्वी, दक्षिणेकडील मद्रास प्रांतात ५३,००० तलावांची मोजणी करण्यात आली होती. इ.स. १८८५ मध्ये केवळ १४ जिल्ह्यांतून ४३,००० तलावांचे काम चालू होते. याचप्रमाणे म्हैसूर राज्यातही इ.स. १९८० पर्यंत (या सध्याच्या उपेक्षेच्या काळातही) ३९,००० तलाव कोणत्या ना कोणत्या रूपात लोकांची सेवा करीत होते.

इकडेतिकडे विखुरलेले हे सारे आकडे एकत्र केले तर असे दिसते की अगदी या शतकाच्या प्रारंभापर्यंत, आषाढाच्या पहिल्या दिवसापासून भाद्रपदाच्या शेवटच्या दिवसापर्यंत, जवळपास ११ ते १२ लक्ष तलाव पाण्याने भरून जात आणि पुढील ज्येष्ठापर्यंत वरुण देवतेचा काही न काही प्रसाद वाटतच असत.

कारण लोक चांगली कामे करीत असत.

❖❖❖

# पायापासून शिखरापर्यंत

आज अवचित एकादशी आहे. चांगले काम करण्यासाठी आज मुहूर्त बघण्याची गरज नाही, तरीसुद्धा सर्व लोक एक दुसऱ्यांची भेट घेऊन विचारणा करीत आहेत. एका नवीन तलावाच्या निर्माण कार्यास आज प्रारंभ होणार आहे.

वाचकांना वाटेल की तलावांच्या निर्मितीचे - पाळू भरण्यापासून ते पाणी भरण्यापर्यंतचे- पूर्ण विवरण येथे मिळणार आहे. आम्ही स्वतः या तलावनिर्मितीच्या तपशिलाच्या शोधात होतो; पण कुठेही तपशील मिळाला नाही. वर्षानुवर्षे जेथे हजारो तलाव तयार होत आले, त्या ठिकाणी तलाव निर्मितीचे विवरण मिळू नये, याबाबत सुरुवातीस आम्हालाही काही तरी चुकल्या सारखे वाटले; पण खरे तर हेच साहजिक आहे.

'तलाव कसे तयार करावेत' या ऐवजी 'तलाव असे तयार करायचे', असेच उदाहरण सर्वदूर मिळत होते. तरीही तुटक तुटक अशी जी काही विवरणे मिळतात त्यांतून तलाव कसे तयार करावेत याचे, अगदी सुंदर नसले तरी कामचलाऊ चित्र तरी स्पष्ट होते.

आज अवचित एकादशी, आता विचारणे नको. सर्व योजना पूर्वीच तर ठरली आहे. तलावाची जागाही निश्चित झालीय. ज्यांनी ठरविले त्यांनी न जाणो किती पावसाळे पाहिलेत; त्यामुळेच पाणी किती येईल, कोठून येईल, त्यापैकी किती पाणी येथे अडविले जाईल हे प्रश्नच येथे निर्माण होत नाहीत. त्यांच्या दृष्टीने हे मोठे प्रश्नच नाहीत; या अगदी साध्या नेहमीच्या सवयीच्या गोष्टी आहेत.

यातील काही जणांनी यापूर्वी अनेक तलाव खोदले आहेत आणि यातीलच काही जण तर पिढ्यान्‌पिढ्या हेच काम करीत आले आहेत.

तलाव बनविण्यासाठी दाही दिशा मोकळ्या आहेत, तरीही तलावाच्या जागेची निवड करताना अनेक बाबींवर लक्ष देण्यात येते, ही जागा गायरानाच्या बाजूस आहे. जमिनीला उतार आहे, खोलगट क्षेत्र आहे. ज्या क्षेत्रातून पाणी वाहून येणार आहे ती मुरमाड जमीन आहे. प्रातर्विधीसाठी त्या भागात कुणीही जात नाही. मेलेल्या जनावरांची कातडी काढण्याचीही ती जागा नाही.

अभ्यासातून अभ्यास वाढतो. अभ्यासू डोळे प्रस्तावित जागा नजरेखालून एक वेळ घालून येतात.

पाणलोट क्षेत्राची (ज्या भागातून तलावात पावसाचे पाणी वाहून येणार आहे) स्वच्छता, सुरक्षितता पक्की केली जाते. पाणलोट क्षेत्रातून उत्तम प्रकारे पाणी मिळेल याबाबत खात्री केली जाते. जिथे पाणी वाहून येईल त्या जागेची वैशिष्ट्ये ध्यानी घेतली जातात. पाळू किती उंच असेल, किती रुंद असेल, कुठून कुठपर्यंत असेल, तसेच पाणी पूर्ण भरल्यानंतर जास्तीचे पाणी वाहून जाण्यासाठी सांडवा कुठे असेल, याचा अंदाज घेण्यात आला आहे.

सर्वजण गोळा झाले, आता वेळ कशाला, चमचमणारी ताटे सजली आहेत. सूर्याची किरणे त्याला अजूनच चमकवीत आहेत. पाण्याने तांब्या भरलेला आहे. रोली, मौली, हळद, अक्षता यांच्यासह लाल मातीची टोपली ठेवली आहे. भूमी आणि जलाच्या स्तुतिसुमनांचे श्लोक हळूहळू जलतरंगामध्ये परिवर्तित होत आहेत.


**वर्षानुवर्षांपासून जेथे हजारो तलाव तयार होत आले,**
**त्या ठिकाणी तलावनिर्मितीचे विवरण मिळू नये,**
**याबाबत सुरुवातीस चुकल्या चुकल्यासारखे वाटले.**
**पण ही एक सहज स्थिती आहे.**
**'तलावाची निर्मिती कशी करावी' या ऐवजी**
**सर्वच तलाव असे तयार करायचे,**
**याचेच चलन होते. यद्यपी छोटे छोटे खंड जोडून**
**त्यास सुंदर तलावाचे रूप भलेही देता आले नाही,**
**तरी कामचलाऊ दृश्यांची कल्पना केली जाऊ शकते.**

वरूण देवतेचे स्मरण केले जात आहे. तलाव कुठेही खोदा, देशातील या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत सर्वच नद्यांच्या नावाने प्रार्थना केली जात आहे. आता श्लोकांचे आवाज थांबून, जमिनीवर आघात करणाऱ्या फावड्यांचे आवाज उठत आहेत. पाच जण पाच पराती माती खोदतात दहा हात पराती उचलून पाळूवर टाकतात. येथे पाळू बांधली जाईल. मुहूर्त साधला, गूळ वाटला जात आहे. डोळ्यांत उभारलेले तलावाचे संपूर्ण चित्र कुदळीच्या साहाय्याने खुणा करून जमिनीवर चित्रित केले आहे. माती कुठून निघेल, कुठे कुठे टाकली जाईल, पाळूपासून किती दूरवर खोदकाम करता येईल, जेणेकरून पाळूच्या ठीक खाली पाण्याच्या दाबाने पाळूच कमजोर होईल इतकी खोली होऊ नये, अशा सर्व गोष्टींचा विचार होतो.

अवचित एकादशीला इतके काम तर निश्चितच होते, परंतु जर काही कारणाने त्या दिवशी काम झालेच नाही, तर मात्र मुहूर्त विचारला जातो, किंवा स्वतःच मुहूर्त काढतात. गावात तसेच शहरातील घराघरांत आढळणाऱ्या पंचांगात इतर अनेक बाबींसमवेत विहीर व तलाव बांधण्याचे मुहूर्त दिलेले असतातच.

हस्त, अनुराधा, तीनही उत्तरा, शतभिषा, मघा, रोहिणी, पुष्य मृगशिरा, पुष्य नक्षत्रामधील मंगळवार, बुधवार, गुरुवार तसेच शुक्रवारी कार्यारंभ करावा. परंतु ४, ९, १४ या तिथी टाळाव्यात. शुभलग्नात गुरू व बुध बली असावा. पापग्रह निर्बल असावेत. शुक्राचा चंद्र हा जल राशीला संलग्न व चौथा असावा. गुरू, शुक्राचा अस्त झालेला असावा. भद्रा असू नये. असे सगळे असले तर तलाव खोदणे शुभ असते.

आज आमच्यातील बहुतांशी लोकांना वरील विवरणातील फार तर दिवसांची काही नावेच समजतील. तरीही आजच्या समाजातील एका मोठ्या भागातील लोकांच्या मनातील घड्याळे या घड्याळांशी मिळतीजुळती आहेत. काही वर्षांपूर्वी तर सारा समाज याच घड्याळांबरोबर चालत असे.




मुहूर्ताची वेळ साधण्यात आली. लोक परत फिरले. आता सवडीप्रमाणे एक-दोन दिवसांत पुनश्च काम सुरू करण्यात येईल.

अनुभवी नजरांच्या पापण्याही लवत नाहीत. किती मोठा तलाव आहे, काम किती आहे, किती लोक लागतील, किती औजारे लागतील, किती मण माती खोदली जाईल, पाळूवर माती कशी टाकली जाईल? टोपल्यांनी वाहून नेता येईल की गाढवांची गरज पडेल?

असे अनेक प्रश्न लाटांसारखे निर्माण होतात. धरण भिंतीचे मातीचे काम किती? चुना व दगडांचे पक्के काम किती? मातीचे कच्चे काम एकदम पक्के करावे लागेल आणि चुना व दगडांचे काम कच्चे राहणार नाही, याबाबत जागरूक राहावे लागेल.

प्रश्नांच्या लाटा उठतात आणि अनुभवी मनातील अथांग खोलीत त्या शांत शांत होत जातात. शेकडो मण मातीचे अत्यंत अवजड असे हे काम आहे. वाहत्या पाण्याचे मन थांबण्यासाठी वळवायचे आहे. पाण्याशी नव्हे तर आगीशी खेळावयाचे आहे.


हलगीच्या आवाजाबरोबर सारे गाव तलावाच्या जागेवर जमा होते. तलावाचे काम एकजुटीने चालेल. सर्वजण एकत्र काम केल्यानंतर एकत्रच घरी परततील.



शेकडो हात माती खोदतात. शेकडो हात माती उचलून पाळूवर टाकीत आहेत. हळूहळू बांधकामाचे पहिले चरण पूर्ण होत आहे. मातीचा एक थर टाकल्यानंतर त्याची दबाई सुरू होत आहे. माती दाबण्याचे काम नंदी करीत आहेत. चार टोकदार खुरांवर बैलाचे पूर्ण वजन पडते व खुरांनी मातीची दबाई होते. पहिला थर पूर्ण झाल्यावर त्यावर दुसरा थर टाकण्यात येतो. प्रत्येक थरावर पाणी शिंपडतात, बैल चालवितात, शेकडो हात भराभर काम करतात. संथ वेगाने कार्य उंच उंच वाढत जाते. आतापर्यंत कुदळीने आखलेली रेखा अस्पष्ट होती. आता मात्र मातीचा ठळकपणे दिसणारा एक पट्टा तयार झालाय. काही ठिकाणी ती रेषा सरळ आहे, तर काही ठिकाणी किंचित वळलेली आहे.

पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी धरण भिंतीवर ज्या ठिकाणी जोर देणार आहे त्या ठिकाणची पाळू व भिंत जास्त मजबूत करण्यावर कटाक्षाने लक्ष पुरविण्यात येत आहे. कोपरापासून हात जसा वळतो तसेच पाळू या ठिकाणी वळली असल्यामुळे या भागातील दबाई अत्यंत काळजीपूर्वक केली जात आहे.

धरणाची जागा गावाच्या जवळच असल्यामुळे दुपारच्या भोजनास सर्वजण घरी जातात. जेव्हा धरण स्थळ लांब असते तेव्हा भोजनही तेथेच घेतात आणि दिवसभर गूळ घातलेले मधुर पाणी सर्वांना दिले जाते. पाण्याचे काम म्हणजे प्रेमाचे काम, पुण्याचे काम! हे काम करताना अमृतासारखे गोड पाणीच पाजावे लागेल, तेव्हाच अमृतासारखे सरोवर निर्माण होईल.



या अमृतमय सरोवराचे रक्षण ही पाळू करणार आहे, कारण तीच तर पालक आहे. बुडामध्ये पाळू किती रुंद आहे, किती उंच उठणार आहे, माथ्यावर किती रुंद असणार आहे, असे प्रश्न गणित किंवा विज्ञानावर आपले ओझे टाकीत नाहीत. अनुभवी नजराच ते ठरवितात. आणि जर का ते गणितीय भाषेत मोजायचे ठरविले तर असे म्हणता येईल की, पाळूच्या पायातील रुंदीच्या अर्धी तिची उंची असेल आणि पूर्ण तयार झाल्यानंतर माथ्यावरची रुंदी ही पाळूच्या उंचीच्या अर्धी असेल.

मातीचे कच्चे काम पूर्ण होत आलेय. आता पक्के काम हाती घ्यावे लागेल. चुनाघाणीत चुना टाकून एकजीव करण्याचे काम चुनकरांनी केव्हाच सुरू केलेय. दगडांना आकार देण्याच्या कामात दगडफोडे व्यस्त आहेत. अमृतसरोवराचे रक्षण करणाऱ्या पाळूचे रक्षण करणारा सांडवा आता बांधण्यात येईल. सांडवा म्हणजे तलावातील अतिरिक्त पाणी पाळूचे नुकसान न करता जिथून बाहेर पडेल ती जागा.

सांडव्याची उंची पाळूच्या उंचीपेक्षा ७ ते १० हात कमी असेल, तेव्हाच तर पाळूला न तोडता पाणी वाहून जाऊ शकेल. पाळू आणि सांडव्याचे काम पूर्ण झाले आणि या प्रकारे तलावाची साठवण क्षमता निर्माण झाली.

पाणलोट क्षेत्रातील सर्व पाणी आता तलावात एकत्र होईल. तलावाच्या क्षमतेपेक्षा पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी कमीजास्त तर नाही ना? याचे पुनः एकदा निरीक्षण अनुभवी नजरा करीत आहेत.

आता शेवटची डुगडुगी वाजत आहे. काम तर पूर्ण झाले आहे, तरीही सर्वजण पुन्हा पाळूवर एकत्र आलेत. अवचित एकादशीला केलेला संकल्प पूर्ण झाला. फक्त पाळूच्या वरच्या बाजूस एका स्तंभाचे बांधकाम व पाळूवर घटोइया देवतेची प्राणप्रतिष्ठा करावयाची बाकी आहे. स्तंभावर गणेशाची मूर्ती विराजमान होईल आणि खाली सर्पराज. घटोइया बाबा घाटावर बसून संपूर्ण तलावाचे रक्षण करतील.

आज सर्वांना भोजन आहे. सुंदर आणि मजबूत पाळूने घेरलेला तलाव एका मोठ्या थाळीसारखा दूरवरून दिसत आहे. ज्या अनामिक लोकांनी याची निर्मिती केली ते आज प्रसाद वाटून एक सुंदर नाव या सरोवरास देतील. आणि हे नाव कागदावर नव्हे तर लोकांच्या हृदयात कोरले जाईल.

परंतु नाव दिले म्हणजे काम संपले नाही. हस्तनक्षत्रात पावसाचे पहिले आगमन होताच सर्वजण पुन्हा तलावावर जमा होतील. अनुभवी नजरांची आजच खरी परीक्षा आहे. लोक कुदळ, फावडे, बांबू, काठ्या घेऊन पाळूवर फिरत आहेत. अतिपरिश्रमाने एक एक थर वाढवीत नेलेली पाळूसुद्धा हे पहिले पाणी पिल्याशिवाय मजबूत होणार नाही.

कुठल्याही क्षणी कुठूनही पाणी पाळूत घुसून भेगा पडण्याची शक्यता आहे. उंदरांनी केलेली बिळे बांबू, काठ्यांनी दाबून दाबून भरण्याचे काम पाळूवरून फिरणारे लोक करीत आहेत.

काल जशी हळूहळू पाळू उंच होत गेली, त्याचप्रमाणे धरणात आता पाणी पातळी वाढत आहे. संपूर्ण पाणलोट क्षेत्रातून पाणी गोळा होत धरणात येत आहे.

**सिमट - सिमट जल भरहि तलावा ।**
**जिमी सदगुण सज्जन पहिं आवा ।।**

अनामिक हातांची भेट पाण्याने स्वीकारली आहे.

❖❖❖

# विश्वसागराचा नायक

हे अनामिक लोक होते तरी कोण?

शेकडो, हजारो तलाव काही अचानक शून्यातून प्रकट झालेले नाहीत. बनवून घेणारा एक असेल तर बनवणारे दहा होते. आणि असे अनेक मिळून शेकडो, हजारो तयार होत असत. परंतु मागील दोनशे वर्षांत थोडेबहुत नवीन शिक्षण प्राप्त केलेल्या समाजाने या शेकडो, हजारोंचा फक्त शून्यच बनविलाय. यापूर्वीच्या काळात इतक्या मोठ्या प्रमाणावर तलावनिर्मिती कोण करीत असेल, या बाबत थोडीसुद्धा उत्सुकता आजच्या या समाजाच्या मनात नाही. अशा प्रकारचे काम करण्यासाठी आज या समाजाने आय.आय.टी.चा, सिव्हिल इंजिनिअरिंगचा एक नवीन साचा तयार केलाय; परंतु यापूर्वी करण्यात आलेल्या कामाची मोजणी या नव्या मापदंडाने करण्याचा प्रयत्नसुद्धा या समाजाने अजूनही केलेला नाही.

स्वतःच्या मोजपट्टीने जर मोजले असते तर निदान असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले असते की, त्या काळातील आय.आय.टी. कुठे होते? कोण होते त्याचे निर्देशक? किती बजेट असे? किती सिव्हिल इंजिनिअर त्यातून तयार होत? मात्र आजच्या समाजाने हे जुन्या काळातील अनुपयुक्त काम समजून पाण्याचा प्रश्न नव्या ढंगाने हाताळण्याचा निश्चय केला आणि दावा पण. खेड्या-वस्त्यांचे सोडून द्या, शहरामधील नळांतून पाण्याऐवजी केव्हाही वाहणारी शांतताच त्यांच्या या निश्चयाचा व दाव्याचा निष्फळपणा प्रचितीस आणते.

या समाजाला येथेच सोडून जरा मागे वळूया. आज जे अनामिक ठरलेत, त्यांचे त्या वेळेस खूपच नाव होते. संपूर्ण देशात तलावांची निर्मिती होत होती आणि ते बनविणारेही साऱ्या देशात होते. काही ठिकाणी ही विद्या जातीच्या विद्यालयात शिकवली जात होती. तलाव बनविणारे हे लोक काही ठिकाणी एकाच जागी वस्ती करून आढळत, तर काही ठिकाणी फिरत फिरत ते हे काम करीत.

या तलावनिर्मितीचे कार्य करणाऱ्या लोकांना अत्यंत आदराने गजधर या सुंदर शब्दाने संबोधित असत. राजस्थानच्या काही भागांत आजही हा शब्द प्रचलित आहे. गजधरचा अर्थ गज धारण करणारा आणि गज म्हणजे मोजमाप करतात ती सळी. तीन हात लांब लोखंडी सळई घेऊन फिरणाऱ्या या गजधरास या समाजाने कधीही मिस्त्री मानले नाही. गजधर हा तर समाजाची खोली मोजणारा आहे, असा उच्च दर्जा समाजाने त्यांना दिला.

गजधर हे वास्तुरचनाकार होते. खेड्यांतील समाज असो वा शहरांतील समाज; त्यांच्या नवनिर्मितीची, व्यवस्थापनाची जिम्मेदारी हे गजधरच सांभाळीत. नगराच्या नियोजनापासून छोट्यात छोट्या निर्माणकार्याचा भार गजधरांच्या खांद्यावर असे. ते योजना बनवीत. कामास लागणाऱ्या एकूण खर्चाचा अंदाज काढीत. निर्माण कार्यास लागणारी सारी सामग्री गोळा करीत. आणि त्या बदल्यात यजमानाकडून त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त असे काही मागत नसत. आणि लोकही असे होते की, त्यांना शक्य होईल तेवढी भेट गजधरांना देत.



काम पूर्ण झाल्यावर पारिश्रमिक देऊन, शिवाय सन्मान करण्याची प्रथा होती. सन्मान म्हणून फेटा भेट देण्याची रीत हल्ली फक्त शीख समाजात दिसते. पण गजधरांना आदराने फेटा भेट करण्याची प्रथा काही काळापूर्वीपर्यंत राजस्थानमध्ये चालू होती. फेट्याच्या समवेत चांदीचे किंवा सोन्याचे बटनसुद्धा कधी कधी देत असत. काही वेळेस त्यांच्या नावावर जमीन केली जात असे. फेटा नेसविल्यानंतर गजधर हे त्यांच्या संघातील अन्य सहकाऱ्यांची नावे सुचवीत; त्यांनाही पारिश्रमिकासमवेत यथाशक्ती काही ना काही वस्तू भेटीच्या स्वरूपात दिली जात असे. कृतज्ञतेचा हा भाव तलावाची निर्मिती झाल्यानंतर आयोजित भोजनसमारंभात विशेष करून दिसत असे.

आधी गजधर हे हिंदू असत, नंतर मुसलमानही. सिलावटा नावाच्या जातीतील लोक वास्तुकलेमध्ये अत्यंत निपुण होते. सिलावटा शब्द शिळेपासून तयार झाला. गजधरांप्रमाणे सिलावटा हेसुद्धा दोन्ही धर्मांत होते. लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांची संख्या बरीच मोठी होती. त्यांच्या स्वतःच्या गल्ल्या होत्या. राजस्थानच्या जुन्या शहरात आजही सिलावटपाडा सापडतात.

सिंध प्रांतात, कराचीमध्ये सुद्धा सिलावटा लोकांच्या मोठमोठ्या गल्ल्या आजही आहेत. गजधर व सिलावटा - एकच काम करणारी ही दोन नावे काही ठिकाणी एकच होतात. जैसलमेर आणि सिंध प्रांतात सिलावटांच्या प्रमुखास गजधर म्हणत असत. कराचीतही यांच्याकडे सन्मानाने पाहिले जात असे.

फाळणीनंतर पाकिस्तान मंत्रिमंडळात एक सिलावट, हाकिम मोहम्मद गजधर यांची नियुक्ती करण्यात आली होती. यांची एक शाखा तोमर वंशापर्यंत जाते आणि समाजातील सर्वोच्च पदाला स्पर्श करते. अनंगपाल तंवरने कधी काळी दिल्लीवर झेंडा फडकविला होता.

अनुभवी नजरांचे सुंदर उदाहरण म्हणजे गजधर होत. गुरू-शिष्य परंपरेतून हे शिक्षण त्यांना मिळत असे. नवीन हातांना जुने हात इतके शिकवीत की काही काळानंतर ते 'जोडिया' बनत. जोडिया म्हणजे गजधरांचा विश्वसनीय सहकारी. एका गजधरासमवेत अनेक जोडिया असत. काही चांगले जोडियाजवळ असणारे गज़धर स्वतः इतके पारंगत होत की गज त्यांच्या हातून केव्हाच सुटून फक्त नावानेच ते गजधर राहत.

जो अवजारांना हात लावत नाही तो उत्तम गजधर अशीही एक व्याख्या होती. फक्त जागा पाहूनच कुठे काय करावे लागेल याचा निर्णय घेत. ते एका ठिकाणी बसत व त्यांच्या तोंडी आदेशावर सारे काम चालत असे.

अवजारांचा उपयोग करता करता ते इतके पारंगत होत की, अवजारांची गरजच त्यांना भासत नसे, ही एक गोष्ट; परंतु कधीही अवजारांना हातच न लावणे ही दुसरी गोष्ट. अशा सिद्ध लोकांना सिरभाव म्हणत असत.

सिरभाव कोणत्याही अवजारांचा उपयोग न करता पाण्याची योग्य जागा दाखवीत. असे म्हणतात की अंतःप्रेरणेतून त्यांना हे कळत असे. सिरभाव हे काही विशिष्ट जातीतले नव्हते. काही लोकांना ही सिद्धी प्राप्त होत असे.

जलसुंघा म्हणजे वासावरून जमिनीतील पाणी सांगणारे. हे लोकसुद्धा सिरभावप्रमाणेच असत. आंब्याच्या किंवा जांभळाच्या काठीच्या साहाय्याने ते पाण्याची जागा दाखवीत. हे काम मात्र आजही चालू आहे. ट्यूबवेल खोदणाऱ्या कंपन्या प्रथम यंत्राच्या साहाय्याने जागा शोधतात आणि नंतर जलसुंघाला बोलावून पाणी मिळेल की नाही याची खात्री करून घेतात. सरकारी क्षेत्रातही कागदावर न आणता यांची सेवा उपयोगात आणली जाते.



सिलावटा हा शब्द मध्यप्रदेशाकडे जाता जाता एक काना हरवून सिलावट असा बनतो, पण गुण मात्र जसेच्या तसे राहतात. मध्य प्रदेशात काही ठिकाणी सिलाकार पण होतो. गुजरातमध्ये त्याची बरीच संख्या आहे. तिथे त्यांना सलाट असे म्हणतात. यातीलच हिरा सलाट हे दगडावरील त्यांच्या कामामुळे खूपच प्रसिद्ध झालेत.

कच्छ प्रांतात गजधर हे गईधर झाले. त्यांचा वंशवृक्ष इंद्र देवाचा पुत्र जयंत याच्यापासून सुरू होतो. गजधराचे एक नाव सूत्रधार असेही आहे. हेच नाव नंतर गुजरातमध्ये ठार व देशाच्या बऱ्याच भागांत सुतार असे झाले.

गजधराचे शास्त्रीय नाव स्थपति असे होते. आजही थवई असे ते प्रचलित आहे. पाथरवट (पथरोट) आणि टकारी हे दगडावर केल्या जाणाऱ्या सर्व कामाचे चांगले जाणकार होते आणि तलाव बनविण्याच्या कामातही त्यांची गरज भासत असे. मध्यप्रदेशमधील पथरौटा नावाच्या गाव आणि गल्ल्या आजही त्यांची आठवण देतात. टकारी लोक लांब दक्षिणेपर्यंत विखुरलेले होते आणि त्यांच्या गल्ल्यांना टकेरवाडी म्हणत असत.

संसार हा मातीचा आहे आणि या मातीचा पूर्ण संसार जाणणाऱ्यांची संख्याही काही कमी नव्हती. यांना मटकूट अथवा मटकुडा म्हणत. जेथे जेथे हे वसत त्या गावास मटकुली म्हणत. सोनकर आणि सूनकर हे शब्द सोन्याचे काम करणाऱ्यांसाठी होते. पण हे सोने, सोने नव्हे तर मातीच होती. सोनकर किंवा सूनकर यांना राजलहरिया असेही संबोधत. हे स्वतःला रघुवंशाचा सम्राट सगरच्या मुलांशी जोडत असत.

अश्वमेध यज्ञासाठी सोडलेल्या घोड्याची चोरी झाली त्या वेळेस सगरपुत्रांनी घोड्याला शोधण्यासाठी संपूर्ण पृथ्वीच खोदून काढली आणि शेवटी ते कपिल मुनीच्या क्रोधाला पात्र ठरले. आणि याच शापामुळे तलावाची माती खोदण्याचे काम सोनकर करू लागले. परंतु या कार्यामुळे ते क्रोध नव्हे तर पुण्य कमाऊ लागले. विटा तयार करण्याच्या कामातही त्यांचा हातखंडा होता. तलावाकरिता माती खोदण्याच्या कामावर खंती यांनाही बोलवीत. काही कारणास्तव खंती तेथे उपलब्ध नसतील तर तलावाच्या मातीविषयी कुंभारांचा सल्ला घेतला जात असे.

तलावाच्या जागेची निवड करताना बुलई, न बोलविता येत. ज्यांना गावाबद्दल माहिती आहे त्यांना बुलई म्हणत. कुठे कोणाची जमीन आहे, कशी जमीन आहे, यापूर्वी तलाव-विहिरी इत्यादी कुठे कुठे बांधल्या आहेत, कुठे बांधता येतील अशी सर्व माहिती बुलईंना तोंडपाठ असे. एवढेच नव्हे तर याबाबतीतील अनेक बारकावे त्यांच्याकडे लिखित स्वरूपातही असत.

मालवा भागात बुलईंच्या मदतीनेच ही सर्व माहिती जमाबंदीत नोंद केली जात असे. आणि ही जमाबंदी प्रत्येक जमीनदारीत सुरक्षित असे.

काही भागांत बुलईंना 'ढेर' असेही म्हणत. मिर्धा पण त्यांच्यासारखेच असत. जमिनीची मापे, हिशोब ते ठेवत, तसेच जमिनीचे वाद मिटविण्याचे कामही करीत.

विटा आणि चुन्याच्या गारा तयार करण्याचे काम चुनकर करीत. फावल्या वेळात मिठाचा व्यापार यांच्याच हाताने होत असे. मध्यप्रदेशात या चुनकरांची संख्या इ.स. १९११ मध्ये २५००० पेक्षाही जास्त होती. ओरिसामध्ये लुनिया, मरहा आणि सांसिया होते.

नवीन लोक तलावांना जसे विसरले तसेच ते बनविणाऱ्यांनाही विसरले. विस्मरण झालेल्या या लोकांच्या यादीत दुसाध, नौनिया, गोंड, परधान, कोल, ढिमर, ढिंवर, भोई इ. चा समावेश होतो. एक काळ असा होता की हेच लोक तलावाचे उत्तम जाणकार समजले जात. आज मात्र यांची ती भूमिका समजून घेण्याचे विवरणही आम्ही हरवून बसलो आहोत.

कोळी लोकांनीही तलावांचे मोठे काम केले आहे. शेकडो तलाव बनविणाऱ्या या कोळी लोकांबाबत माहिती देणारी एक ओळसुद्धा आज सापडत नाही. मात्र एक काळ होता की आपल्या गावात वस्ती करावी म्हणून कोळी जातीच्या सदस्यांना अनेक सुविधा दिल्या जात. महाराष्ट्र व गुजरातमधील अनेक गावांत त्यांना देण्यात आलेल्या जमिनीचा शेतसारा माफ केला जात असे. अशा जमिनीला बारा किंवा बारो म्हणत असत.

अगरिया लोक खरोखर लोहपुरुष होते. लोखंडाचे काम करणारी ही जमात होती; परंतु काही ठिकाणी अगरिया तलावाचेही काम करीत. तलाव खोदकामासाठी लागणारी गेंती, फावडा, बेल, मेटाक, घमेले, तगाडी इत्यादी अवजारे बनविणारे अगरिया लोक ती अवजारे चालविण्यात कोणाच्याही मागे नव्हते. 'बेल' वरूनच बेलदार हा शब्द बनलाय.

माळी समाज आणि परिहार समाजसुद्धा तलाव बांधण्यात व त्यानंतर तयार झालेल्या सरोवरात कमळ व कुमदिनीसारखे फुलांचे वेल लावण्यात योगदान देत असत. काही ठिकाणी तर तलावाच्या काठावरील काही जमीन माळी कुटुंबासाठी सुरक्षित ठेवली जात असे. त्यांच्या जीवनाचा आधार तलाव असे आणि आयुष्यभर ते तलावांचे रक्षण करीत.

भिल्ल, भिलाले, सहरिया, कोल या समाजाची गणना आज अनुसूचित जातीच्या यादीत केली जाते; पण एक काळ असा होता की त्यांची छोटी छोटी राज्ये होती, त्यांच्या राज्यातील पाणी आणि तलावांची व्यवस्था ते स्वतः सांभाळीत.

वाहत्या पाण्याला बांध घालून कुठे अडवायचे आणि अडलेल्या पाण्याला सिंचनाकरिता किती दूरपर्यंत न्यायचे हे कौशल्य, भिल्ल लोक धनुष्यबाणाप्रमाणे आपल्या खांद्यावरच ठेवून असत. तलावाच्या पाण्याचा दाब व बांधण्यात आलेले बांध यांची त्यांना चांगली परीक्षा होती. पाण्याचा दाब किती आहे आणि किती अंतरापर्यंतच्या विहिरींना तो जिवंत ठेवू शकेल, याबाबतचे रहस्य आपल्या बाणाद्वारे रेषा आखून ते दाखवू शकत असत.

मिणा जमातीचे लोक राजस्थानमध्ये हे काम करीत. अलवर जिल्ह्यातील तरुण भारत संघ नावाच्या एका छोट्याशा नवीन संस्थेने मागील १० वर्षांत २००० पेक्षा अधिक तलावांची निर्मिती केली आहे. प्रत्येक गावात त्यांना जाणवले की, तलाव बनविण्याचे शास्त्र पूर्ण गावालाच अवगत आहे. कठीणातल्या कठीण प्रसंगातसुद्धा या संस्थेस बाहेरून सल्ला घेण्याची गरज पडली नाही. कारण तेथे असलेले मिणा लोक अनेक पिढ्यांपासून तलावनिर्मिती करीत आलेत.

भिल्ल लोकांत अनेक पोट विभाग होते. नायक, नायका, चोलीवाला नायक, कापडिया नायक, मोठा नायक, छोटा नायक तसेच तलाविया, गरासिया इत्यादी सर्वजण तलाव व पाण्याच्या कामाचे नायक म्हणविले जात.

नायक किंवा कोकण - महाराष्ट्रातील नाईक ही उपाधी बंजारा समाजातही होती. वनात वास्तव्य करणारा वनचर, बिनचर यांना हळूहळू बंजारा असे संबोधन वापरण्यात आले. बंजारा समाज आज दयनीय अवस्थेत आहे, परंतु एके काळी शेकडो प्राण्यांवर माल लादून एका शहरातून दुसऱ्या शहरात व्यापारासाठी हे जात. उसाच्या क्षेत्रातील गूळ भाताच्या क्षेत्रात व पुन्हा भात घेऊन दुसऱ्या क्षेत्रात नेऊन विकण्याचा व्यवसाय ते करीत.

शहाजहान बादशहाचा वजीर आसफजहाँ इ.स. १६३० मध्ये दक्षिणेत आला त्या वेळी त्यांच्या सैनिकांचे सामान, भंगी-जंगी नावाच्या नायक बंजाराच्या बैलावर लादलेले होते.

त्या बैलांची संख्या होती एक लाख ऐंशी हजार. भंगी-जंगी शिवाय शाही फौज हलणे शक्य नव्हते. त्यांच्या प्रशंसेत आसफजहाँने सोन्यात लिहिलेला एक ताम्रपट भंगी-जंगीस भेट दिला होता.

या वर्णनात काही प्रमाणात अतिशयोक्ती असेलही; परंतु एवढे मात्र खरे की, मोजणे कठीण होईल इतके पशू ज्या कळपात असत त्या कळपास एक लाख पशूंचा कळप मानला जात असे, आणि त्या टोळीच्या नायकास लाखा बंजारा असे म्हणत. हजारो पशूंचे हे कळप शेकडो लोक घेऊन चालत. त्यांच्या एक दिवसाच्या मुक्कामावर किती पाणी लागत असेल याचा अंदाज करता येतो. जिथे जिथे हे जात त्या त्या ठिकाणी पूर्वीचा तलाव नसेल तर तलाव बांधणे आपले कर्तव्य आहे असे ते मानत.

मध्यप्रदेशामधील सागर नावाच्या जागी बनविलेला सुंदर व मोठ्ठा तलाव अशाच कुण्या लाखा बंजाराने बांधला होता. छत्तीसगढमध्ये आजसुद्धा अनेक गावांतील लोक आपल्या तलावास कुण्या लाखा बंजाराची नावे जोडून आठवणीत ठेवतात. या अज्ञात लाखा बंजाराच्या हातांनी बनलेल्या ज्ञात तलावांच्या यादीत अनेक प्रदेशांच्या नावांचा समावेश होईल.

गोंड समाजाचाही तलावाशी घनिष्ठ संबंध आहे. महाकौशलमध्ये गौंड समाजाचा हा गुण जागजागी तलावांच्या स्वरूपात विखुरलेला आढळतो. कुडनद्वारे निर्मित जबलपूर जवळचा तलाव आज एक हजार वर्षांनंतरही उपयोगात आहे. राणी दुर्गावती याच समाजात होऊन गेली. याच राणीने आपल्या छोट्याशा कालखंडात एक मोठा प्रदेश तलावांनी भरून टाकला.

गोंड हे स्वतः तलावनिर्मिती करतच होते; पण त्याच समवेत तलाव निर्मिती करणाऱ्या इतरांचाही ते खूप सन्मान करीत. गोंड राजांनी उत्तर भारतातील कोहली समाजाच्या लोकांना महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यात मोठ्या उत्साहाने आणून वसविले होते. त्याच कारणामुळे भंडारा जिल्ह्यात असे अनेक सुंदर तलाव आढळतात.

मोठ्या तलावांच्या यादीत सर्वप्रथम क्रमांकावर असणारा प्रसिद्ध भोपालताल राजा भोज यांनी निर्माण केला होता. मात्र ही योजना कालिया नावाच्या एका गोंड सरदाराच्या मदतीनेच पूर्णत्वास गेली. भोपाल व होशंगाबादच्या मधील दरीतून वाहणारी कालिया सोत नदी याच गोंड सरदाराच्या नावे ओळखली जाते.

**गोंड समाजाचाही तलावाशी घनिष्ठ संबंध आहे.**
**महाकौशलमध्ये गौंड समाजाचा हा गुण जागजागी**
**तलांवाच्या स्वरूपात विखुरलेला आढळतो.**
**कुडनद्वारे निर्मित जबलपूर जवळचा तलाव**
**आज एक हजार वर्षांनंतरही उपयोगात आहे.**
**राणी दुर्गावती याच समाजात होऊन गेली.**
**याच राणीने आपल्या छोट्याशा कालखंडात**
**एक मोठा प्रदेश तलावांनी भरून टाकला.**

ओढिया, ओढही, ओरही, ओड, औड. जसजशी जागा बदलली तसतसे त्यांचे नावही बदलत गेले. काम मात्र एकच, दिवस-रात्र तलाव आणि विहिरी निर्माण करणे आणि तेही असंख्य. विहिरीचे दुसरे नाव ओड असेच आहे. त्यामुळेच तर अशी म्हण पडली की 'ओड हे लोक रोज नवीन विहिरीचे पाणी पितात.' वस्तू बनविणारे आणि बनणाऱ्या वस्तूचे एकच नाव असल्याचे यापेक्षा चांगले उदाहरण शोधूनही सापडणार नाही. हे लोक पश्चिमेतील गुजरातपासून राजस्थान, उत्तर प्रदेश, विशेषतः बुलंदशहर आणि त्याजवळील क्षेत्र, महाराष्ट्र, मध्यप्रदेश,ओरिसापर्यंत वास्तव्यास होते. ओरिसामध्ये कधीकाळी कठीण संकट आले असताना नऊ लाख ओड लोक धार नगरीत पोहोचल्याची कथा ऐकू येते. हे लोक गाढवे पाळीत.

कधी हे गाढवावरून माती वाहून पाळू बनवीत, तर कधी तलावासाठी माती खोदत. स्त्रिया व पुरुष एकत्रच काम करीत. ओडी लोकांना मातीची जाण होती. रंग व मातीचा गंध यावरून मातीचे विशेष गुणधर्म ते उत्तम रीतीने ओळखत. मातीचा थर व दाबही ते उत्तमप्रकारे ओळखत. राजस्थानमध्ये आजही एक म्हण आहे की 'ओडी लोक कधीच दबून मरणार नाहीत.'

प्रसिद्ध लोकनायिका जसमा ओडन धार नगरीच्या अशाच एका तलावावर काम करीत असताना राजा भोजच्या नजरेत भरली होती आणि तिच्यावर मोहित झालेल्या राजा भोजने तिच्यासाठी आपल्या राज्यावर पाणी सोडण्याचा निर्णय घेतला होता. राजाने जसमाला एका सोन्याच्या अप्सरेच्या रूपात कल्पिलेले होते, परंतु ओढी कुटुंबात जन्म घेतलेली जसमा स्वतःलाच नव्हे तर सर्व जगालाच मातीचे मानणाऱ्या परंपरेचा एक हिस्सा होती. कथा सांग्ते की, जसमाच्या प्राप्तीसाठी राजा भोज काहीही करण्यास तयार होता. स्वतःचे कर्तव्य सोडून, करू नयेत अशा गोष्टी पण करू लागला होता. अशा राजाची राणी बनण्यापेक्षा मृत्यूला कवटाळण्याचा निर्णय जसमा घेते.

राजाचे नाव लोपले पण जसमा ओडनचे नाव आजही ओरिसापासून छत्तीसगढ, महाकौशल, मालवा, राजस्थान आणि गुजरातमध्ये घेतले जाते. या घटनेला शेकडो वर्षे लोटली, पण वरील भागांत पिकांची कापणी झाल्यानंतर रात्ररात्र जागवून जसमा ओढनची गीते गायली जातात, त्यावर नाटके दाखविली जातात. जसमा ओढण अजरामर झाली आहे. जसमा ओडनचे यश लोकांच्या मनावर अजूनही आहे. परंतु ओढी लोकांनी बांधलेल्या तलावांचे, विहिरींचे यश मात्र लोक विसरले. जे खरोखर राष्ट्रनिर्माता होते त्यांनाच आज रोजगार व अन्न मिळविण्यासाठी दारोदार भटकण्याची वेळ आली आहे. बरेचसे ओढी आजही ती कामे करतात. इंदिरा नहर बनविण्याच्या कामामध्ये हजारो ओढी लागले होते.

ओरिसामध्ये ओढीशिवाय सोनपुरा आणि महापात्रेसुद्धा तलाव आणि विहिरींचे निर्माते होते. गंजाम, पुरी, कोणार्क आणि आजूबाजूंच्या क्षेत्रात यांची वस्ती होती. बालंगीर जिल्ह्याच्या सोनपुरा गावातून निघालेले लोक म्हणजे सोनपुरा हे होत.